कोणत्याही क्षेत्रातील काही लोक ठरवून तर काही अकल्पितपणे त्या-त्या क्षेत्रात आलेले असतात. अनपेक्षितपणे घडलेल्या गोष्टी माहीत करून घेण्यामध्ये मानवाला नेहमीच आकर्षण राहिलेले आहे. ग्रंथपाल म्हणून कार्यरत असलेल्या व्यक्ती या क्षेत्रात कशामुळे आल्या? त्यांना कोणत्या व्यक्तीने, कोणत्या प्रसंगाने या क्षेत्रात येण्यासाठी प्रोत्साहित केले? सुरवातीला मिळालेल्या छोट्याशा प्रोत्साहनाचे पुढे 'करियर' करण्यासाठीच्या ध्येयामध्ये कसे रुपांतर झाले? अशी विविध माहिती देणारे हे पुस्तक आहे. ग्रंथपालन क्षेत्रात 'करियर' करण्यासाठी तरुणांना या पुस्तकातील ग्रंथपालांची मनोगतं नक्कीच प्रोत्साहित करतील.


प्रा. राजेंद्र कुंभार

चरित्र ₹ 250
ISBN 978-93-86401-35-9
डायमंड पब्लिकेशन्स
info@diamondbookspune.com
www.diamondbookspune.com
9 789386 401359 >
919

Book
923.891
DHA
053489

# असा मी घडलो

## गाथा ग्रंथपालांची



923.891
DHA
053489
053489

संपादन
रणजित धर्मापुरीकर
डॉ. मेधा धर्मापुरीकर

Scanned by TapScanner

असा मी घडलो : गाथा ग्रंथपालांची
संपादन : रणजीत धर्मापुरीकर, डॉ. मेधा धर्मापुरीकर

Asa Mi Ghadalo
Sampadan : Ranjit Dharmapurikar, Dr. Medha Dharmapurikar.

पहिली आवृत्ती : मे, २०१८

ISBN 978-93-86401-35-9

© डायमंड पब्लिकेशन्स, २०१८

मुखपृष्ठ
शाम भालेकर

अक्षरजुळणी
मानसी घाणेकर

मुद्रक
स्टार कॉपिअर्स प्रा. लि. पुणे

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
दाखल क्र. 53489
दिनांक : 03/12/18
नाशिक

प्रकाशक
डायमंड पब्लिकेशन्स
२६४/३ शनिवार पेठ, ३०२ अनुग्रह अपार्टमेंट
ओंकारेश्वर मंदिराजवळ, पुणे-४११ ०३०
☎ ०२०-२४४५२३८७, २४४६६६४२
info@diamondbookspune.com

ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी भेट द्या
www.diamondbookspune.com

प्रमुख वितरक
डायमंड बुक डेपो
६६१ नारायण पेठ, अप्पा बळवंत चौक
पुणे-४११ ०३० ☎ ०२०-२४४८०६७७

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी-फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या आणि लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

# संपादकीय

## रणजीत धर्मापुरीकर

संकल्प करून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र व्यवसाय स्वीकारणाऱ्या फार मोजक्या व्यक्ती असाव्यात. व्यावसायिक पदवी व्यतिरिक्त इतर म्हणजे कला, वाणिज्य, विज्ञान या विद्याशाखांमधून पदवीचे शिक्षण घेणाऱ्यांचा बहुतेकांचा पुढचा मार्ग ठरलेला नसतो. आज ग्रंथालय आणि माहितीशास्त्र व्यवसायात कार्यरत असणारे काही मान्यवर यांच्या बाबतीत हे खरे असावे. जे ग्रंथालय आणि माहिती क्षेत्रात येऊन स्थिरावले आहेत किंवा निवृत्त झाले आहेत, त्यांनी जर त्यांचा या क्षेत्रातल्या प्रवेशाचा मागोवा घेतला, तर हे स्पष्ट होईल.

पदवीपर्यंतचे शिक्षण झाल्यानंतर, बहुतांश पदवीधारक नोकरीचा विचार करतात. असे करत असताना मग इतर सोबती काय करणार आहेत, याचा कानोसा घेतला जातो. मग असे समजते की, अमुक अमुक याने हा कोर्स केला आणि तो आता नोकरीला आहे. स्पर्धा परीक्षा अथवा इतरत्र कुठेही प्रवेश मिळाला नाही, इतर अभ्यासक्रमात अयशस्वी झाल्यावर सहसा, 'चला हा ग्रंथालयाचा कोर्स करुयात' असे ठरते. एकदमच, अशाप्रकारे हा व्यवसाय निवडलाही नसेल; पण असेच काहीतरी घडले असावे. शालेय अथवा महाविद्यालयीन शिक्षणात सामान्य शैक्षणिक कर्तृत्व असलेले; पण या विषयात रुची निर्माण झालेले विद्यार्थी ग्रंथापालन व्यवसायात असामान्य कर्तृत्व गाजवतात, हे नक्की. यापूर्वी या क्षेत्रात शिक्षण घेण्याच्या संधी फार कमी होत्या. या क्षेत्राला प्रतिष्ठा नव्हती. आता असे जाणवत आहे की, शैक्षणिक आणि कॉर्पोरेट क्षेत्रात का होईना; पण थोडीशी प्रतिष्ठा आली आहे. उच्चशिक्षण आणि कॉर्पोरेट क्षेत्रात तरी चांगल्या मिळकतीची व सुरक्षित कामाची हमी देणारा म्हणून हा व्यवसाय ओळखला जातो आहे; पण तरीही पूर्व निश्चय करून हा व्यवसाय स्वीकारणाऱ्यांची संख्या कमीच आहे. एखादा व्यवसाय नावारूपास केव्हा येतो, जेव्हा त्या क्षेत्रात काम करणारे बहुसंख्य



Scanned by TapScanner

१८. डॉ. राजेंद्र खामकर ८०
१९. डॉ. गणेश खांडेकर ८५
२०. डॉ. हितेश ब्रिजवासी ९०
२१. नितीन चवरे ९५
२२. प्रकाश बर्वे ९९
२३. ज्योती मगर १०४
२४. नारायण फड १०८
२५. डॉ. साधना सातव ११२
२६. संदीप सुर्वे ११४
२७. नीलम चव्हाण ११७
२८. प्रा. बाबुलाल शेख १२१
२९. शीतल दाणेकर १२५
३०. Dr. Nandakumar Dahibhate १२८
३१. Dr. Shantashree Sengupta १४१
३२. Dr. Kishor Ingale १५१
३३. Geetanjali Wani १५७
३४. Minaj Naikwade १६३
- लेखकांची सूची १६६
- संपादक – परिचय १७२




## ग्रंथपाल करिता प्रतिज्ञा

ग्रंथालय आणि माहितीसेवा
हे माझे ध्येय आहे.

सारे वाचक, अभ्यासक, संशोधक
माझे बांधव आहेत.

माझ्या कर्तव्यावर माझी निष्ठा आहे.

माझ्या ग्रंथालयातील समृद्ध आणि
विविधतेने नटलेल्या वाचनसाहित्यसंग्रहाचा
मला अभिमान आहे.

त्या संग्रहाचा व वाचकांचा पाईक होण्याची पात्रता
माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी ग्रंथालय व माहितीशास्त्राचे नियम, कायदे,
तत्त्वांचा व ते तयार करणाऱ्या गुरुजनांचा
आणि वडीलधाऱ्या वाचकांचा मान ठेवीन
आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माहिती सेवा कार्य, भविष्यातील आधुनिक बदल
व माझे वाचक यांच्याशी निष्ठा राखण्याची
मी प्रतिज्ञा करीत आहे.

त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी
ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.



Scanned by TapScanner

आल्या. मन निराश झालं; पण निश्चय वाढला होता. प्राध्यापक पात्रता परीक्षेचा सेट अभ्यास सुरू केला व दुसऱ्याच प्रयत्नात यशस्वी झालो. मग काय, वाणिज्य व व्यवस्थापन हे आपले क्षेत्र नसून, ग्रंथालयशास्त्रच आपले क्षेत्र आहे. लगेच नोकरी बघायला सुरुवात केली व वाशिम जिल्हा येथील बालाजी अध्यापक महाविद्यालय येथे मिळालीसुद्धा व मी ग्रंथपाल म्हणून कार्याला सुरुवात केली. आज माझ्याकडे सहा वर्षांचा अनुभव असून, मी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किन्हवली, ता. शहापूर, जि. ठाणे येथे कार्यरत आहे. मला मार्गदर्शन करणाऱ्या सर्वांचा तसंच माझ्या भरकटत्या मनाला वळणावर आणणाऱ्या सर्व गुरुजनांचा मी आभारी आहे.





## प्रकाश बर्वे

"...आणि मी ग्रंथालय आणि माहितीशास्त्राकडे वळलो." या शीर्षकाने आज १२ वर्षे या क्षेत्रात काम करीत असताना मी गत काळात दूर निघून जातो आणि या क्षेत्राचा माझ्या आयुष्यावर कसा बदल झाला, याकडे मी कसा वळलो, ही कलाटणी मला कुणी दिली, हे सर्व आठवतो. या आठवणी तशा फार गंमतिशीर आहेत.

शालेय जीवनात माझी कच्चा विद्यार्थी म्हणून ख्याती होती. मी परीक्षेची प्रश्नपत्रिका अभ्यास बघून करायचो. त्यामुळे पूर्ण पुस्तक मी कधीच वाचले नाही. अक्षर हे सुंदर असावे असा मी विचारदेखील माझ्या शालेय जीवनात कधी केला नव्हता. कसाबसा १०वीपर्यंत पोहोचलो.

१०वी ही माझ्या आयुष्याची यशाची कदाचित पहिली पायरी असावी. कारण याचवर्षी वर्गात माझ्या मराठीच्या वर्गशिक्षिका सौ. फूलदेवरे यांच्या तासाला त्या शिकवीत असलेल्या कुसुमाग्रज यांच्या कवितेत 'कुसुम' हे मुलीचे नाव आहे, असे भर वर्गात मी बोललो आणि या 'कुसुमाग्रज' नावाची माहिती देण्यात 'ते कुसुमताई यांचे अग्रज म्हणजे मोठे भाऊ' हे समजावून सांगेपर्यंत तो तास संपला आणि आधीच अभ्यासात आणि अक्षरात सुमार कामगिरी असल्याने वर्गात बाई मला खूप अपमानकारक बोलल्या. त्या



Scanned by TapScanner

दिवशी मी पहिल्यांदा सार्वजनिक वाचनालयात गेलो. कुसुमाग्रज हे नाव ज्या-ज्या ठिकाणी आहे, ते-ते शोधून काढले. एक स्मरणिका हाती लागली. त्यात कुसुमाग्रज यांचे अक्षर आणि घरचा पत्तादेखील होता. मग मी धाडस करून वर्गातील झाला प्रकार त्यांना कसा सांगता येईल, याचा विचार करू लागलो.

पहिले पाऊल उचलले, ते अक्षर सुंदर करण्यासाठी. याकरिता मला गुरू भेटले. ते सिनेमागृहात पोस्टर रंगविणारे दादा. त्यांचे नावदेखील प्रकाश होते. अमिताभ, जया, रेखा, मिथुन चक्रवर्ती या सिनेकलाकारांच्या नावाने आणि 'खून पसीना', 'मैं तुलसी तेरे आंगन की', 'लावारिस' या चित्रपटांच्या नावाने रंगकाम करीत माझी अक्षर बाराखडी आणि सुलेखन सुरू झाले.

मी माझे पहिले पोस्टकार्ड पत्र थेट वि.वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांनाच लिहिले. मला तुम्हाला भेटायचे आहे आणि त्याला त्यांचा होकारदेखील प्राप्त झाला. मी फक्त त्यांना सुंदर अक्षरांत पत्र पाठविता यावे, म्हणून अक्षरे गिरविली होती आणि वाचन वाढविले होते. १०वी पास झालो आणि तात्यासाहेबांकडे जाऊ लागलो आणि त्यांचा थेट लेखनिकच झालो, हे माझे पहिले यश. तात्यासाहेब शिरवाडकर आणि नाटककार प्रा. वसंत कानेटकर या दोन 'करांनी' माझ्या जीवनाला अर्थ प्राप्त झाला. या साहित्य सारस्वतांकडे मला लेखनिक म्हणून नऊ वर्षे कामाची संधी प्राप्त झाली.

आर्ट्स म्हणजे कला आणि यात जास्त अभ्यास करावा लागत नाही. प्रवेश सहज मिळतो म्हणून या शाखेकडे वळलो. हे सर्व करीत असतानाच नाटककार प्रा. वसंत कानेटकर यांचाही लेखनिक झालो. 'कवितेचे रस ग्रहण करा', असा गृहपाठ वर्गात दिला होता. तो मी थेट कुसुमाग्रज यांना दाखविला आणि म्हणालो, 'मला कवी शंकर वैद्य यांची कविता आहे.' त्यावर ते म्हणाले, ''तू भाग्यवान आहेस. ते मला उद्या घरी भेटण्यासाठी येत आहेत. त्यांनाच विचारू.'' सकाळ होताच कवी शंकर वैद्य भेटले. सकाळी चहाच्या कपाबरोबर त्यांनी मला सर्व विषय समजाविला. बी.ए. पूर्ण झाले होते.

एके दिवशी याच कुसुमाग्रज प्रतिष्ठानात सकाळी प्रा. डॉ. राजेंद्र कुंभार सर आले. कुसुमाग्रज प्रतिष्ठानात के.ज. म्हात्रे संदर्भ वाचनालय आहे. तेथे मी ग्रंथपाल मीरा देशपांडे यांना मदतनीस म्हणून काम करत असे. प्रा.डॉ. राजेंद्र कुंभार सर यांनी माझी चौकशी केली. तात्यांना ते म्हणाले, ''या मुलाला ग्रंथालयशास्त्राकडे पाठवा.'' क्षणाचाही विचार न करता, तात्यासाहेबांनी माझी सर्व फी भरली. माझा या शाखेला प्रवेश करून दिला.

कुसुमाग्रज प्रतिष्ठानात के.ज. म्हात्रे संदर्भ वाचनालयात एका वर्तमानपत्र कात्रण प्रकल्पात सुरुवातीलाच काही ओळी होत्या, ''गावात एक



वेळ देऊळ नसले तरी चालेल; मात्र ज्ञानाचा उगम आणि विकासाचं साधन असणारे वाचनालय अत्यावश्यक आहे.'' या ओळी मला ज्ञानाच्या एका अद्भुत दुनियेत नेतील आणि माझे आयुष्य समृद्ध करतील, हे स्वप्नातदेखील वाटले नव्हते. नाशिकच्या एच.पी.टी. महाविद्यालयात प्रा.डॉ. राजेंद्र कुंभार, रूपनसिंग, वाणी सर, स्वाती भडकमकर, सुनीता कुलकर्णी, पोटे सर यांनी ग्रंथालय आणि माहितीशास्त्राची शिकवण दिली. याच महाविद्यालयातून खऱ्या अर्थाने माझी जडणघडण झाली.

माझे चुलते नाशिकच्या एका सिनेमागृहात मॅनेजर होते. आमच्या वर्गावर कुंभारसरांचा संदर्भसेवेचा क्लास होता. मी मुलांना कॉमन ऑफ घेऊन 'हे राम' हा चित्रपट दाखविण्यासाठी घेऊन गेलो. दुसऱ्या दिवशी सरांनी मला 'तासाला काल का नाही आले?' विचारले. मी, 'मुलांना कॉमन ऑफ घेऊन 'हे राम' हा चित्रपट दाखविण्यासाठी घेऊन गेलो', असे सांगितले. सर काहीच बोलले नाहीत. मी खजिल झालो आणि दुपारी जेवणाच्या सुटीत श्री. पोटे सर यांना विनंती केली आणि सर्व लायब्ररी स्वच्छ केली. त्यातील संदर्भ विभागातील एकेक ग्रंथ नीटनेटका लावला आणि माझी चूक सुधारली. त्याचा मला आज प्रत्येक संदर्भ शोधताना फार उपयोग होतो. तासाला न बसता आल्याने मी कुंभारसर यांच्या मार्गदर्शनाला मुकलो होतो आणि माझ्यामुळे माझे मित्रसुद्धा; पण कुंभारसर यांची शिकवण ही त्यांच्या मौनातूनदेखील एखादा विद्यार्थी घडविते, याची मी स्वत: प्रचीती घेतली होती.

कुसुमाग्रज प्रतिष्ठानात के.ज. म्हात्रे संदर्भ वाचनालयात आता मी सहायक ग्रंथपाल झालो होतो. ग्रंथालय 'ब' वर्गात गेले होते. याचवेळी नाशिकचे पोलीस अधीक्षक डॉ. भगवंतराव मोरे हे त्यांच्या पत्नीसोबत कुसुमाग्रज प्रतिष्ठानात के.ज. म्हात्रे संदर्भ वाचनालयात आले होते आणि त्यांनी तात्यासाहेबांना विनंती केली, ''मला हा तुमचा लेखनिक काही दिवस मिळेल का?'' त्यावर तात्यासाहेब म्हणाले, ''त्याला आता साहित्यिक भाषेबरोबरच सरकारी भाषाही आली पाहिजे. म्हणून जरूर घेऊन जा.'' मी आता मा. पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण डॉ. भगवंतराव मोरे यांचा लेखनिक झालो. नंतर मा. पोलीस आयुक्त नाशिक, मा. पोलीस महानिरीक्षक नाशिक परिक्षेत्र तसेच पुढे मा. जिल्हाधिकारी श्री शेखर गायकवाड यांचाही लेखनिक झालो. शिक्षण सुरू ठेवत एम.लिब. आणि २००४मध्ये महाविद्यालय शिक्षक राज्य पात्रता चाचणीत पहिला आलो. पास झालेल्या यादीत केवळ एकच नाव होते. सुंदर अक्षरामुळे पुढे मा. मंत्री यांची भाषणे तयार करणे अशी कामे येऊ लागली. एव्हाना मी नाशिकच्या यशवंतराव

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
दाखल क्र. 63489
दिनांक

चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात मा. डॉ. मधुकर शेवाळे यांच्याकडे साहाय्यक ग्रंथपाल म्हणून २००६मध्ये रुजू झालो. डॉ. एम.के. पाटील सर, डॉ. अनिल चिकाटे, मा. रवींद्र मेंढे, श्री. धर्मापुरीकर सर यांचे मार्गदर्शन लाभले. हा ग्रंथालय परिवार किती मोठा आहे, याची प्रचीती आली. डॉ. वीर, डॉ. कुमार, डॉ. पानगे, डॉ. बनसोडे, डॉ. खोत, डॉ. मोहन खेरडे, डॉ. वायदंडे, डॉ. मंगला हिरवाडे, डॉ. कांबळे, डॉ. बागर यांसारखे शिक्षक आणि डॉ. सेनगुप्ता, डॉ. शिल्पा वाघमारे, गीतांजली अमृतकर, संभाजी पाटील, भास्कर विसपुते यांसारखे या क्षेत्रात काम करणारे माझे सहकारी मित्र भेटले आणि हा प्रवास सुखकर झाला.

विद्यापीठात काम करीत असताना भारताचे राष्ट्रपती मा. डॉ. प्रतिभाताई पाटील यांचे भाषण लिहून देण्याचे भाग्य प्राप्त झाले. कुलगुरु डॉ. राजन वेळूकर, डॉ. कृष्ण कुमार, डॉ. माणिकराव साळुंखे यांचा संपर्क आणि समन्वय अधिकारी होता आले. पुढे विद्यापीठात येणारे प्रमुख अतिथी ना. शरद पवार, अणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, अणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष डॉ. एस.के. सिन्हा, राज्यपाल महाराष्ट्र राज्य मा. डॉ. सी. विद्यासागर राव, राज्यपाल एस.सी.जमीर, राज्यपाल के. शंकर नारायणन्, राज्यपाल सिक्कीम, मा. श्री. श्रीनिवास पाटील, राज्यपाल आसाम, मा. पी.बी. आचार्य यांच्या दौऱ्याकामी संपर्क आणि शिष्टाचार अधिकारी म्हणून कामाची संधी मिळाली. सुंदर अक्षरामुळे सुलेखनकार अच्युत पालव यांच्यासोबत काम करता आले व भारताच्या निवडणूक आयोगाकडून खास नाशिक लोकसभा मतदारसंघात निवडून येणारे लोकसभा सदस्य यांचे निवडून आल्याचे प्रमाणपत्र लिहिण्याचा मान आज १२ वर्षांपासून मिळत आहे. तो याच क्षेत्रामुळे. या पवित्र क्षेत्रातून आज अनेक माणसे जोडली गेली.

कधीही पूर्ण पुस्तक न वाचणारा मी पुस्तकाचे पान आणि पान वाचन करू लागलो. आणि मित्रहो, वर्गात शेवटच्या बाकावर बसणाऱ्या आणि आपल्याला पुस्तक वाचायला येऊ नये म्हणून कंटाळा करणारा... मी ग्रंथालय आणि माहितीशास्त्राकडे वळलो.

कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय शिक्षण आणि अशा अनेक ज्ञानशाखा आहेत. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र ही ज्ञानशाखा फार वेगळी आहे. यात केवळ ग्रंथालयच नव्हे, तर नव्याने यात समाविष्ट झालेली माहितीशास्त्र ही शाखादेखील आहे. ग्रंथाचा छपाईपासून ते वाचकांपर्यंतचा प्रवास या ज्ञानशाखेत आहे. ग्रंथवर्गीकरण, तालिकीकरण, तात्त्विक, ग्रंथालय आणि समाज, ग्रंथांचे प्रकार, संदर्भग्रंथ, विश्वकोश,



शब्दकोश, ध्वनिमुद्रिका असे अफाट विषय या शाखेत आहेत. खरं तर ग्रंथपाल हा या अंधाऱ्या अज्ञानातील वाटाड्याच आहे.

आज अनेक मान्यवर व्यक्तींसोबत काम करताना या शाखेचा मला मोठा फायदाच होत आहे आणि खंतदेखील वाटते की, ग्रंथपालाचे वेतन हे सामाजिक जीवनात पुरेसे असताना, तो डॉक्टरेट असताना, का असेना, या क्षेत्राबाबत लोक दुय्यम विचार करतात.

हे बदलायला हवे. परदेशात जो मान या शाखेला आहे, तोच भारत देशातही असायला हवा; पण तो आपण सर्वांनी मिळवून दिला पाहिजे आणि आपल्या क्षेत्रात आपण कमी नाही, हे पटवून देता आले पाहिजे.



Scanned by TapScanner